भारत India Forum

**Bharat India Forum**
C/O- Krushiking, 1st Floor, Shivaratna Complex,
Opposite DAV Public School Ambedkar Chowk,
Aundh, Pune, Maharashtra- 411007
bharatindiaforum@gmail.com YouTube

दिनांक: २१ फेब्रु. २०१९

प्रति,
मा. देवेंद्र फडणवीस,
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.

**विषयः शेतीविषयक कर्जाच्या बाबतीत धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी होणे बाबत.**

महोदय,

शेतकऱ्यांच्या कर्जासंदर्भात गेल्या काही दिवसांत दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. त्या संबंधात भारत-इंडिया फोरम खालील मागण्या करत आहे.

१. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने चालू आर्थिक वर्षातील शेवटचे द्वैमासिक पतधोरण नुकतेच जाहीर केले. या पतधोरणात रेपो रेटमध्ये पाव टक्क्यांची कपात करण्याबरोबरच शेतकऱ्यांसाठी विनातारण कर्जाची मर्यादा एक लाखावरून एक लाख साठ हजारावर नेण्याची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेने २०१० मध्ये शेतकऱ्यांसाठी विना तारण कर्जाची मर्यादा एक लाख रूपये इतकी निश्चित केली होती. त्यानंतर गेल्या नऊ वर्षांत या मर्यादेत बदल करण्यात आलेला नव्हता. या पार्श्वभूमीवर 'देशात २०१० नंतर महागाईत खूप वाढ झाली. शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा (खते, बियाणे, किटकनाशके इत्यादी) महागल्या. परिणामी शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च वाढला,' ही बाब रिझर्व्ह बँकेने अधिकृतरित्या मान्य केली आहे. त्यामुळेच विनातारण कर्जाची मर्यादा वाढवण्यात आली आहे. या निर्णयाचा लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना फायदा होईल, असे बँकेने म्हटले आहे.

विनातारण कर्ज मर्यादेत वाढ करण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय धोरणात्मक बाब म्हणून निःसंशय महत्त्वपूर्ण आहे. भारत- इंडिया फोरम या निर्णयाचे स्वागत करतो. परंतु सध्या शेतकऱ्यांना एक लाखापर्यंतचे कर्जही सहजासहजी विनातारण मिळत नाहीत, असा अनुभव आहे. सरकारने जाहीर केलेल्या धोरणाचा प्रत्यक्षात शेतकऱ्यांना लाभ मिळतच नाही. कारण अगदी अपवादात्मक उदाहरणे वगळता बँका शेतकऱ्यांना विनातारण कर्जे देतच नाहीत. वास्तविक बँका शेतकऱ्यांना जमीन तारण ठेऊनसुध्दा कर्ज देण्यास फारशा उत्सुक नसतात. तेथे विनातारण कर्जाच्या बाबतीत तर बँकाचा दृष्टिकोन अत्यंत उदासीन आणि प्रतिकूल असतो. 'विनातारण कर्ज कुठलीच बँक देत नाही. अशी कुठलीच स्कीम नाही,' असे उत्तर बँक अधिकाऱ्यांकडू मिळते. खरं तर नियामनुसार शेतीशी संबंधित एक लाखापर्यंतची सगळी कर्जे विनातारण असतात. (दहा लाखापर्यंतची सगळी व्यापारी कर्जेही विनातारण असतात. त्यात डेअरी, पोल्ट्री सारख्या शेतीपूरक उद्योगांसाठीच्या कर्जांचाही समावेश असतो.) पण हे धोरण केवळ कागदावरच आहे. बँका प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करतच नाहीत. त्यांच्या लेखी शेतकऱ्यांना पतच नाही. या पार्श्वभूमीवर विनातारण कर्जाच्या मर्यादेत केलेली वाढ ही शेतकऱ्यांसाठी 'घोषणामात्र' ठरण्याची शक्यता जास्त आहे.

त्यामुळे राज्य सरकारने तात्काळ राष्ट्रीयीकृत, खासगी आणि सहकारी बँकांना स्पष्ट निर्देश देऊन विनातारण कर्जाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास भाग पाडावे.

भारत India Forum

**Bharat India Forum**
C/O- Krushiking, 1st Floor, Shivaratna Complex,
Opposite DAV Public School Ambedkar Chowk,
Aundh, Pune, Maharashtra- 411007
bharatindiaforum@gmail.com YouTube

२. नुकतेच **'बजाज आलियान्झ'** आणि **'महाराष्ट्र ग्रामीण बँका'** यांच्या माध्यमातून शेतकऱ्याना कर्ज घेताना 'विमा पॉलिसी' विकत घेण्याची अट घातल्याच्या तक्रारी असल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या. अशा प्रकारचे प्रकार विविध बँकांच्या बाबतीत यापूर्वीही घडलेले असून त्यासंबंधात शेतकऱ्यांनी तक्रारी केलेल्या होत्या. सदर प्रकार यापुढे घडू नयेत, तसेच, शेतीविषयक कर्ज घेताना इतर कोणत्याही प्रकारची सेवा विकत घेण्यासाठी शेतकऱ्याला नाडले जाऊ नये यासाठी शासनाने कर्ज वितरण करणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका, खासगी बॅँका, राष्ट्रीयीकृत बॅंका व सहकारी वित्त संस्थाना निर्देश द्यावेत तसेच त्याकरिता विशेष मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात.

मुळातच अडीअडचणीकामी अथवा शेतीकामी, शेतकरी कर्ज घेताना, एखादी विमा पॉलीसी विकत घेणे संयुक्तिक ठरत नाही. अशा प्रकारे कर्जाचा विनियोग झाल्यास, भविष्यात कर्जमाफी करताना या कर्जाचा प्रत्यक्ष बोजा हा शासनावरच पडत असतो. म्हणून वित्त-वितरणाच्या प्रक्रीयेत केवळ वित्त वितरीत केले जावे अशी तरतूद अथवा दंडक केला तर ते जास्त प्रभावी ठरेल.

कृषी कर्ज देताना प्रत्येक वित्त वितरण संस्थेला शेतकऱ्यांकडून "सदर कर्ज घेताना मला कर्जासोबत इतर कोणतेही उत्पादन/ सेवा/ पॉलिसी विकत घेण्याचे बंधन घालण्यात आलेले नाही/ अथवा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सुचविण्यात आलेले नाही", असे प्रतिज्ञापत्र कर्जदाराच्या स्वाक्षरीनिशी जोडण्याचे बंधन घालण्यात यावे.

कळावे,

विनय हर्डीकर (संपर्क-९८९०१६६३२७)
निलेश शेजवळ
डॉ. दिनेश भोसले
दीपक चव्हाण
योगेश थोरात
डॉ. नरेश शेजवळ
डॉ. अंकुश चोरमुले
अभिजित कुपटे
डॉ. सुभाष आठल्ये
राजीव बसर्गेकर

(सदस्य, भारत इंडिया फोरम पुणे)

भारत
India
Forum

**Bharat India Forum**

C/O- Krushiking, 1st Floor, Shivaratna Complex,
Opposite DAV Public School Ambedkar Chowk,
Aundh, Pune, Maharashtra- 411007

bharatindiaforum@gmail.com YouTube